सातारा जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या आपत्तकालीन परिस्थितीचे अनुषंगाने सातारा तालुक्यातील टोळेवाडी व मोरेवाडी येथे निवारा शेड बांधणेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्र.आव्यप्र- २०१९/प्र.क्र.५८/आव्यप्र-२
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दि. ०६ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- शासन निर्णय क्र. सीएलएस-२०१९ / प्र.क्र.१६५ / म-३, दिनांक २९.०८.२०१९

प्रस्तावना :

सातारा जिल्ह्यात अतिवृष्टीमूळे आलेल्या आपत्तीमध्ये, डोंगर खचणे, दरड कोसळणे, भूसख्लन होणे इत्यादी कारणामूळे सातारा जिल्ह्यातील सातारा तालूक्यातील गावे बाधित झाली. त्या गावातील नागरीकांना तात्पुरते स्थलांतरीत करावयाचे असल्याने, त्यासाठी तात्पुरता निवाऱ्यासाठी पत्र्याचे शेड उभारणी करावयाची असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १४ ऑगस्ट २०१९, शासन निर्णय निर्गमित केले आहे त्यानुसार ऑगस्ट २०१९ ला उद्भवलेल्या पूर परिस्थितीत बाधित गावातील त्वरित कामे करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट ४२ खालील वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार तात्पुरता निवारा केंद्र उभारण्याचे काम करण्यात आले आहे. त्यासाठी त्यांनी केलेले प्रस्तावित अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सातारा जिल्ह्यातील सातारा तालुक्यात अतिवृष्टीमुळे आलेल्या नैसर्गिक आपत्तीने बाधीत गावातील नागरीकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्यासाठी तात्पुरते पत्र्याचे शेड उभारावयाचे असल्याने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांनी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्क्म
१.	सातारा तालुक्यातील टोळेवाडी येथे भुस्खलनामुळे बाधीत झालेल्या लोकांसाठी निवारा शेड बांधणे (शेड नं. १ व २)	रु. ३१,२२,३६९/-
२.	सातारा तालुक्यातील टोळेवाडी येथे भुस्खलनामुळे बाधीत झालेल्या लोकांसाठी निवारा शेड बांधणे (शेड नं. ३ व ४)	रु. ३१,२२,३६९/-
३.	सातारा तालुक्यातील टोळेवाडी येथे भुस्खलनामुळे बाधीत झालेल्या लोकांसाठी निवारा शेड बांधणे (शेड नं. ५ व ६)	रु. ३१,२२,३६९/-
४.	सातारा तालुक्यातील टोळेवाडी येथे भुस्खलनामुळे बाधीत झालेल्या लोकांसाठी निवारा शेड बांधणे (शेड नं. ७ व ८)	रु. ३१,२२,३६९/-

५.	सातारा तालुक्यातील टोळेवाडी येथे भुस्खलनामुळे बाधीत झालेल्या लोकांसाठी निवारा शेड बांधणे (शेड नं. ९ व १०)	रु. ३१,२२,३६९/-
६.	सातारा तालुक्यातील टोळेवाडी येथे भुस्खलनामुळे बाधीत झालेल्या लोकांसाठी निवारा शेड बांधणे (शेड नं. ११ व १२)	रु. ३१,२२,३६९/-
७	सातारा तालुक्यातील मोरेवाडी येथे भुस्खलनामुळे बाधीत झालेल्या लोकांसाठी निवारा शेड बांधणे.	रु. ३१,२२,३६९/-
एकूण एकंदर		रु. २,१८,५६,५८३/-

१. सातारा जिल्ह्यातील तालुका सातारा येथील वर दर्शविलेल्या गावातील तात्पुरते निवाऱ्यासाठी पत्र्याचे शेड उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांनी सादर केलेल्या रु. २,१८,५६,५८३/- (रु. दोन कोटी, अठरा लक्ष, छप्पन हजार, पाचशे त्र्याऐंशी फक्त) च्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.
२. सातारा तालुक्यातील वर नमूद केलेल्या गावात तात्पुरते निवारा केंद्र उभारण्यात येईल. सदर काम ३० दिवसात पूर्ण करण्यात यावे.
३. बाधीत कुटुंबांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था शासनाकडून केली जाणार असल्याने त्यांना शासन निर्णय दि.२९.०८.२०१९ अन्वये अनुज्ञेय करण्यात आलेली घर भाडयाची एकरक्कमी मदत मिळणार नाही. माहे जूलै, ऑगस्ट २०१९ मधील अतिवृष्टीमूळे आलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीने दिलेल्या मान्यतेनुसार सदर प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.
४. याकामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६ २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य ९२ राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरीक्त खर्च (९२) (०१) घराची दुरुस्ती / पुनर्बांधणी यासाठी सहाय्य (अनिवार्य) (२२४५ २३२७) या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१९-२० या वर्षाकरीता करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात येईल.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक - २०१९०९०७१४३३३७३३१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.09.07 14:43:56 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, पुणे,
२. जिल्हाधिकारी, सातारा,
३. जिल्हाकोषाधिकारी, सातारा,
४. निवड नस्ती, आव्यप्र-२